# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

जा.क्र/भिनिशमनपा/आस्था./३६३२/२०२१ दिनांक: ०६ /०९ /२०२१

## // जाहिरात //

**विषय : कोरोना विषाणू (कोविड-१९) तिसऱ्या लाटेचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेत खालील पदांची एकत्रित ठोक मानधन तत्वावर कंत्राटी पध्दतीने आवश्यकतेनुसार नेमणूक करणेसाठी गुणवत्ता यादी तयार करणेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू (कॉविड १९)तिसऱ्या लाटेचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरीता खालील नमूद पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करुन इच्छुक व पात्र उमेदवारांची निवड करणेकामी गुणवत्ता यादी तयार करणेसाठी अर्ज करण्यासाठी कळविण्यात येत आहेत. खालील नमुद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या तसेच इतर अटींची पूर्तता करणाऱ्या **उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह दि. १४ /०९ /२०२१ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत ईमेल / ऑफलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे.** इच्छुक व पात्र उमेदवारांनी त्यांचे अर्जासोबत दिलेल्या विहित नमुन्यामध्ये ईमेलद्वारे शैक्षणिक अर्हता व अनुभव प्रमाणपत्र स्कॅन कागदपत्रांसह **bncmc.est@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावेत**. तसेच ऑफलाईन पध्दतीने अर्ज करण्याकरीता आस्थापना विभाग पहिला मजला, रूम नं. १०६, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका मुख्य कार्यालय, भिवंडी येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. तसेच **bncmc.gov.in** या संकेतस्थळावर सदर जाहिरात व अर्जाचा नमुना जोडण्यात आला आहे.

| अ.क्र. | कंत्राटी पदाचे नाव | पद संख्या (बदल होऊ शकतो) | शैक्षणिक पात्रता व आवश्यक अनुभव | मासिक ठोक एकत्रीत मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी (एम.बी.बी.एस.) | १५२ | मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी आणि वैद्यकिय अधिकारी पदाचा २ वर्षे शासकिय/निमशासकीय/नामांकित रुग्णालयाचा अनुभव. | रुपये ६०,०००/- |
| २ | वैद्यकिय अधिकारी **(आयुष.)** | ७२ | मान्यता प्राप्त विद्यापीठाची बी.ए.एम.एस., बी.यु.एम.एस.,बी.एच.एम.एस., बी.डी.एस. पदवी आणि वैद्यकिय अधिकारी पदाचा २ वर्षे शासकिय/निमशासकीय/नामांकित रुग्णालयाचा अनुभव. | रुपये ४०,०००/- |
| ३ | **भिषक तज्ञ (MD.(Med.))** | ०८ | मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.डी.(मेडिसीन) पदवी आणि वैद्यकिय अधिकारी पदाचा २ वर्षे शासकिय/निमशासकीय/नामांकित रुग्णालयाचा अनुभव. | रुपये १,००,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | **बालरोग तज्ञ (MD.(Paed.))** | ०४ | मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.डी.(पेडियाट्रीक) पदवी आणि वैद्यकिय अधिकारी पदाचा २ वर्षे शासकिय/निमशासकीय/नामांकित रुग्णालयाचा अनुभव. | रुपये १,००,०००/- |
| ५ | **हॉस्पीटल मॅनेजर** | २० | मान्यता प्राप्त वैद्यकिय शाखेची पदवी, हॉस्पीटल मॅनेजर पदाचा १ वर्षाचा अनुभव. | रुपये ३५,०००/- |
| ६ | स्टाफ नर्स **(GNM)** | ४६८ | जी.एन.एम./बी.एस.सी. नर्सिंग अभ्यासक्रम उत्तीर्ण, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | रुपये २५,०००/- |
| ७ | फार्मासिस्ट **(D.Pharm/B. Pharm)** | ६८ | डी फार्म/ बी. फार्म, अनुभव असल्यास प्राधान्य. | रुपये २०,०००/- |
| ८ | लॅब टेक्निशियन **(B.SC.DMLT)** | ५२ | बी.एससी, डी.एम.एल.एटी, अनुभव असल्यास प्राधान्य. | रुपये १८,०००/- |
| ९ | ए.एन.एम. **(H.S.C. With A.N.M.)** | १०० | ए.एन.एम./, नर्सिंग अभ्यासक्रम उत्तीर्ण, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | रुपये २०,०००/- |
| १० | एक्स-रे टेक्नीशियन **(X-Ray Technician)** | ३६ | डिप्लोमा व डिग्री पदवीधर. | रुपये १८,०००/- |
| ११ | वॉर्डबॉय **(१० पास)** | १४८ | १० पास उत्तीर्ण गुणपत्रीका | रुपये १५,०००/- |

**अटी व शर्ती :-**

१. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त अर्जांच्या छाननी अंती प्रारूप गुणवत्ता (Draft List) यादी तयार करून आवश्यकतेप्रमाणे म्हणजेच महानगरपालिका प्रशासन आवश्यकता विचारात घेऊन गरज भासेल त्याप्रमाणे प्रारूप गुणवत्ता यादीमधुन **मासिक ठोक मानधन तत्वावर कंत्राटी स्वरूपाने करार करून देण्याच्या अटीवर नियुक्ती आदेश देण्यात येतील.**

२. सदर जाहीरातीमधील पदसंख्या अथवा इतर बाबीमध्ये बदल करणे जाहिरातीनुसार होणाऱ्या भरती प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा बदल करणे अथवा जाहिरातीनुसार होणारी भरती प्रक्रिया कोणत्याही टप्यावर कोणतेही कारण न देता रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्त भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांना आहेत.

३. सदर पदाच्या कंत्राटी नेमणुका वस्तुनिष्ठ मूल्यांकन (Objective assessment) पध्दतीने पदाची शैक्षणिक अर्हता व अनुभव विचारात घेऊन करण्यांत येतील.

४. उपरोक्त पदांकरीता कालावधी प्रथमतः २ महिने किवा कोरोना (कोविड-१९) चा प्रादुर्भाव संपेपर्यंत जे आधी घडेल तो पर्यंत असेल. तसेच आवश्यकतेप्रमाणे १ दिवस सेवा खंड करून पुर्ननियुक्ती देण्याबाबत काम समाधानकारक केले असेल अशा उमेदवारांचा विचार कला जाईल.

५. सदरची नियुक्ती ही ठोक मानधन तत्वावर कंत्राटी स्वरुपाची व कोविड-१९ साथरोग कालावधीसाठी आहे. **साथरोगाचा प्रादुर्भाव संपल्यानंतर त्यांची नियुक्ती संपुष्टात येईल.** त्यापुढे त्यांना भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका सेवेत सामावून घेण्याबाबत किंवा **भविष्यात कायम स्वरूपी नोकरी मागण्याचा हक्क राहणार नाही.**

६. क्षेत्रीय स्तरावर सामाजिक बांधिलकीने काम करण्याची आवड असावी तसेच शारीरिक दृष्ट्या काम करण्यास सक्षम असावा.

७. वयोमर्यादा ६० वर्षापर्यंत.

८. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेत कोविड-१९ साठी यापूर्वी सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी काम केलेल्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

९. सदरची नेमणूक तात्पुरती **ठोक मानधन तत्वावर करार पध्दतीने असल्याने** उमेदवारांची निवड स्थानिक परिस्थिती व गरजेनुरूप करण्यात येणार आहे. याबाबत कोणतीही विचारणा दुरध्वनीवर करण्यांत येऊ नये.

१०. नियुक्त उमेदवारांना नियुक्त कोविड रुग्णालयात कोविड-१९ रूग्णांची सेवा करणे अनिर्वाय राहील.

११. निवड झालेल्या उमेदवारांनी पात्रता व अनुभवाच्या मुळ कागदपत्रांसह एक पासपोर्ट आकाराचा फोटो व आवश्यक मुळ कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतीचा एक संच घेऊन नियुक्तीसाठी हजर राहणे आवश्यक आहे.

१२. विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, पूर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, गुणपत्रक अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती (True copy) जोडलेले नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील.

१३. प्रारूप गुणवत्ता यादी (Draft Merit List) मधून नियुक्ती करण्यात येणाऱ्या उमेदवारांना नियुक्ती आदेश दिल्यानंतर ०३ दिवसांच्या आत रुजू होणे आवश्यक राहील.

१४. वरील पदासाठी कामाचे स्वरूप ठरविण्याचे अधिकार वैद्यकीय आरोग्य अधिकारी / विभाग प्रमुख यांना राहतील.

१५. सदर पदांना दररोज किमान आठ तास (रुग्णालयाच्या सोईनुसार ) सेवा देणे बंधनकारक असेल. तथापि, कोविड-१९ चा प्रादुर्भाव विचारात घेता अत्यावश्यक सेवा असल्याने आवश्यकतेप्रमाणे जादाचे कामकाज करावे लागेल व त्याचे अतिरिक्त मानधन अदा करण्यात येणार नाही. पदांची कामकाजाची वेळ निश्चित करण्याचे अधिकार विभाग प्रमुख यांचे असतील.

१६. अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१७. पात्र उमेदवारास नियुक्ती देणेबाबतचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

१८. उमेदवाराला नियुक्तीनंतर राजीनामा द्यावयाचा असल्यास किमान १५ दिवसांची लेखी नोटीस द्यावी लागेल अन्यथा त्या महिन्याचे मानधन अदा केले जाणार नाही.

१९. संशयास्पद सचोटी, गैरवर्तवणुक/अशोभनीय वर्तन, वरीष्ठाची दिशाभूल करणे, गैरहजर राहणे, आदेशाचे पालन न करणे याबाबत कोणतीही पूर्वसूचना न देता सेवा संपुष्टात आणली जाईल.

२०. वेळोवेळी लागू करण्यात येणाऱ्या इतर अटी/शर्ती संबंधितांना लागू राहतील. तसेच उमेदवाराचे काम समाधानकारक नसल्यास कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांची सेवा समाप्त करण्याचे अधिकार मा. आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांना राहतील.

२१. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हता धारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन व दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास त्याची उमेदवारी आपोआप रद्दबातल होईल. तसेच अशा उमेदवारांची नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

२२. विहित मुदतीत विहित नमुन्यात (भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या अर्जाचा नमुना) अर्ज प्राप्त न झाल्यास असे अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत तसेच त्या अर्जदारांशी कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही यांची स्पष्ट नोंद घ्यावी.

**(दिपक पूजारी)**
उप-आयुक्त (मुख्यालय)
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.**

# अर्जाचा नमुना

**पदाचे नांव :- .......................................................... पदांचा सांकेतिक क्र. ...................................**

**मा. उप-आयुक्त (मुख्यालय)**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
निविन प्रशासकिय ईमारत, काप आळी,
जुना एस.टी स्टॅण्ड, भिवंडी – ४२१ ३०२, जि. ठाणे.

**(१) संपूर्ण नाव** **मराठी** **इंग्रजी (कॅपिटल लेटर)**

**१. आडनांव** : ............................................... ...............................................

**२. स्वत:चे नांव** : ............................................... ...............................................

**३. वडिलांचे/पतीचे नांव** : ............................................... ...............................................

**(२) पत्रव्यवहाराचासंपूर्णपत्ता** : ..........................................................................................

**(पिन कोडसहित)** ..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

**संपर्कासाठी दूरध्वनी क्र.** : ..........................................................................................

**ई-मेलआयडी** : ..........................................................................................

**ओळखपत्र क्र.** : ..........................................................................................

**(३) अ) जन्मतारीख** : **तारीख** **महीना** **वर्ष**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

**ब) जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांक रोजीचे वय** : ......................**वर्ष**......................**महिने**..................**दिवस**

**(४) राष्ट्रीयत्व** : **भारतीय / अभारतीय**

**(५) शैक्षणिक अर्हता :**

| अ.क्र | उत्तीर्ण केलेली परीक्षा | मंडळ/विद्यापीठाचे नाव | परीक्षा प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |

(६) अनुभव :

| संस्थेचे नाव पत्ता | कालावधी | | एकुण वर्ष | सेवा सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(७) **अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.**

१) गुणपत्रिका
२) पदवी उत्तीर्ण प्रमाणपत्र
३) नोदणी प्रमाणपत्र
४) आधारकार्ड (आधारकार्ड नसल्यास अन्य शासकीय ओळखपत्र)

❖ **अर्हता व नोंदणी प्राप्तपत्र सादर केले नाही तर अर्जाचा विचार केला जाणार नाही याची मला जाणीव आहे.**

**अर्जदाराची सही /-**

**ठिकाण :-**

**दिनांक :-**